एमआयडीसी भोसरी पोलीस स्टेशन,पिंपरी-चिंचवड
पत्ता.-सेक्टर नं.०७, स्पाईन रोड, एमआयडीसी भोसरी, पुणे
फोननं.- ९३५६९३४०४२, ईमेल-psbhosarim.pcpc-mh@gov.in

प्रेस नोट ता.२५/११/२०२६

अल्पवयीन पिडीतेवरील विनयभंग प्रकरणात आरोपीस ५ वर्षाची शिक्षा

एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २४१/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ७५(१) तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासुन संरक्षण अधिनियम कलम ८,१०,१२ अन्वये दाखल गुन्हयात मा.श्री.एस.एन. यादव, विशेष न्यायाधीश, पिंपरी चिंचवड जिल्हा व सत्र न्यायालय यांनी आरोपी दिनेश बाबुराम चौधरी वय २८ वर्ष यास दोषी ठरवून ५ वर्षाच्या कारावसाची शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्हा दि.०८/०५/२०२६ रोजी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे येथे दाखल करण्यात आला होता. गुन्हयाचा तपास सपोनि श्रीमती मनिषा दशवंत, यांनी ३० दिवसांचे आत पुर्ण करुन, दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केले होते. सदरचा खटला जलदगतीने चालविण्यात यावा करीता अभियोग पक्षाचे वतीने मा. न्यायालयात विनंती करण्यात आली होती. मा.न्यायालयाने सदर प्रकरणाची सुनावणी जलदगतीने घेऊन दि.२१/११/२०२६ रोजी न्यायनिर्णय दिलेला आहे.

मा.न्यायालयाने आरोपीस सुनावलेली शिक्षा

१) भारतीय न्याय संहिता कलम ७५(१) अन्वये २ वर्ष कारावास व २,००० रुपये दंड
२) बालकांचे लैंगिक अपराधांपासुन संरक्षण अधिनियम कलम ८ अन्वये ३ वर्ष कारावास व २,००० रुपये दंड
३) बालकांचे लैंगिक अपराधांपासुन संरक्षण अधिनियम कलम १० अन्वये ५ वर्ष कारावास व २,००० रुपये दंड
४) बालकांचे लैंगिक अपराधांपासुन संरक्षण अधिनियम कलम १२ अन्वये २ वर्ष कारावास व २,००० रुपये दंड

सदर सर्व शिक्षा एकत्रितपणे भोगावयाच्या आहेत.

सदर प्रकरणात विशेष सरकारी अभियोक्ता ॲड. स्मिता चौगुले यांनी सरकार पक्षातर्फे प्रभावीपणे बाजु मांडली. तसेच कोर्ट पैरवी अधिकारी म.पोहवा संगिता सरसे, यांनी न्यायालयीन कामकाजात समन्वय साधला.

सदरचा तपास मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त, डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.सारंग आवाड, अपर पोलीस आयुक्त (प्रादेशिक विभाग) डॉ. बसवराज तेली, पोलीस उपआयुक्त, परि-३ श्री. मारुती जगताप, सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. सुधाकर यादव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गणेश जामदार व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. भोजराज मिसाळ, यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.